I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 210-213
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCES
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# महिला सक्षमीकरण आणि सरकारी योजना

प्रा.सौ. वासंती देवनाथ खाडिलकर/देवीकर

गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख
कला वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूर
ब्वततमेचवदकपदह ।नजीवत रूअेंदजपकमअपांत/हउंपसण्बवउ

ब्वउउनदपबंजमक रू२०ण्०२ण्२०२२ | त्मअपेपवद रू १५ण्०३ण्२०२२ ।बबमचजमक रू२५ण्०३ण्२०२२ | च्नइसपेीमक रू ०१ण्०४ण्२०२२

**सारांश :**

समाज आणि कुटूंबाच्या उज्वल भविश्याकरिता महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्याच्या वैयक्तीक विकासासाठी व सामाजिक विकासासाठी स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम करणे तसेच महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे, त्यांना त्यांचे सर्व निर्णय स्वतः घेण्यास सक्षम करणे. भारतात महिला सक्षमीकरणाला सतत प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे महिला ाारिरीक मानसिक आणि सामाजिक दृश्टया सक्षम होतील. देशाला सक्षम बनविण्याकरिता आदि महिलांवर होणारे अत्याचार थांबविणे आवश्यक आहे. जेणेकरून महिलांचा विकास होईल आणि ते देशाच्या विकासात आपली भुमीका बजाऊ ाकतील बऱ्याच संघर्शानंतर स्त्रियांना मतदानाचा अधिकार, मालमत्तेचा अधिकार, नागरी हक्क, विवाह आणि नौकरीच्या बाबतीत कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. महिला आणि किशोरावस्थेतील मुलींच्या सुरक्षीततेसाठी ‘‘बेटी बचाओ बेटी पढाओ’’ उज्वला योजना किशोरी कौशल्य योजना, महिला हेल्पलाईन योजना, निवडणूकांमध्येदेखील महिलांकरिता आरक्षीत जागा ठेवल्या जात आहे. यांसारख्या कल्याणकारी योजना भारत सरकारद्वारे राबविण्यात येत आहे. महिला संक्षमीकरणाचा खरा अर्थ तेव्हा समजेल जेव्हा त्यांना भारतात चांगले शिक्षण दिले जाईल आणि त्यांना प्रत्येक क्षेत्रात स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास सक्षम बनविले जाईल. प्रस्तुत ाोधनिबंधात सरकारी योजनेचे महत्व याचा आढावा घेण्यात येत आहे.

**बीजशब्द :** महिला, महिला सक्षमीकरण, महिलांच्या सरकारी योजना

**प्रस्तावना:**

कोणत्याही समाजाचे आकलन होण्यासाठी त्या समाजातील स्त्रीयांच्या दर्जाचा अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या युगामध्ये स्त्री विकासाव्दारे, स्त्री कल्याण, स्त्री सक्षमीकरण या विचाराला सर्व समाजातुन मान्यता मिळत आहे. आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये स्त्रीयांचे महत्व खुपच आहे. ‘‘यत्र नारायस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता’’ म्हणजे तिथे स्त्रियांची पुजा केली जाते तिथे देवता वास करतात. एका स्त्रीमध्ये इतकी ाक्ती असुनही तिच्या सक्षमीकरणाची गरज ही ाोकांतीका आहे. समाजाच्या जडणघडणीत तिचे योगदान खुप महत्वाचे आहे. आज कुटुंब, समाज, राश्ट्र व जगाच्या विकासासाठी स्त्री सक्षमीकरणाचे महत्व पटु लागले आहे. १९७५ साली आंतरराश्ट्रीय ‘स्त्री दर्शक’ म्हणून जगभर मानले गेले. भारतातही २००१ हे वर्श ‘महिला सक्षमीकरण वर्श’ म्हणून साजरे केले.

मानवी हक्काविशयी व अनेक आंतरराश्ट्रीय करारात मान्यता मिळुनही बऱ्याच स्त्रिया ह्या निर्धन आणि निरक्षर असण्याचे प्रमाण खुप आहे. मालमत्तेची मालकी, पत पुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगार, वैद्यकीय सुविधा पुरूशांच्या तुलनेत स्त्रीयांना कमी संधी मिळते. त्या घरगुती

OPEN ACCES

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

हिंसाचाराला बळी पडतात. तसेच पुरूशांच्या तुलनेत राजकीयदृश्टया सक्रिय राहण्याची क्षमता कमी आहे. स्त्रियांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्वाचे आहे. ग्रामीण भागातील स्त्रिया या अजुनही स्वतः निर्णय घेऊ ाकत नाही. त्या पुरूशांच्या निर्णयावर अवलंबुन राहतात. त्यामुळे त्यांची निर्णय क्षमता वाढणे अत्यंत आवश्यक आहे. स्त्रीयांना घटनेने अनेक अधिकार दिले आहे. परंतु त्यांची माहिती अजुनही त्यांच्यापर्यंत पोहचलेली नाही. स्त्री अजुनही 100 टक्के सक्षम झालेली नाही.

आजही स्त्री फक्त चुल आणि मुल याकडे लक्ष दिले पाहिजे असे अनेक जणांना वाटते. परंतु आता स्त्रीने चुल आणि मुलासोबतच देश आणि विदेशाकडे लक्ष देत आहे. मानव जातीत स्त्रीचा जवळपास निम्मा भाग आहे. त्यांचा जीवनमान उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासुन ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अशा अनेक प्रकारे हिनत्वाची वागणूक स्त्री जातीला मिळत राहीली आहे. हा भेदभाव दुर करून स्त्रियांच्या प्रगतीकरिता पोशक वातावरणाची निर्मिती करणे, त्यांचे सुचालन करणे, लैंगिक समतेव्दारे समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृश्टीकोन केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे स्त्री सक्षमीकण होय.

भारतात स्त्रीयांना सक्षम करण्यासाठी सर्व प्रथम समाजातील त्यांचे जे अधिकार आणि मुल्ये आहेत ते नश्ट करणाऱ्या विचारांना मारणे अत्यंत आवश्यक आहे. उदा. निरक्षरता, लैंगिक हिंसा, असमानता, हुंडा व्यवस्था, भृण हत्या, घरगुती हिंसा, वेश्या व्यवसाय, मानवी तस्करी इत्यादी. आपल्या देशात स्त्री पुरूश असमानतेचे प्रमाण खुप जास्त आहे. महिलांना त्यांच्या कुटुंबाबरोबरच बाहेरच्या समाजाच्या वाईट वागणुकीचा त्रास होत आहे. भारतात निरक्षर महिलांची संख्या सर्वात जास्त आहे. शिक्षणाच्या बाबतीत भारतातील महिला पुरूशांच्या तुलनेत मागे आहेत. भारतात पुरूशांचा शिक्षणाचा दर ८१.३ टक्के आहे तर महिलांचा शिक्षणाचा दर केवळ ६०.६ टक्के आहे. भारतातील ाहरी भागातील महिला ग्रामीण भागातील महिलांपेक्षा जास्त रोजगारक्षम आहेत. ग्रामीण भागातील सुमारे ९० टक्के महिला मुख्यतः ोती आणि त्यासंबंधित कामामध्ये रोजदारीवर काम करतात तर ाहरातील सॉफ्टवेअर उद्योगात सुमारे 30 टक्के महिला काम करतात.

**महिला सक्षमीकरणाच्या योजना :-**

महाराश्ट्र ाासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करून 2001 मध्ये दुसरे तर 2014 मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित करण्यात आले. या सर्व धोरणांमध्ये मुख्यतः स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविशयक कायदे, प्रसारमाध्यमाची भुमिका, स्वयंसेवी संस्थाचा सहभाग, स्त्रीयांना केंद्रस्थानी मानुन योजनांची निश्चिती, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, स्वयंसाहाय्यता बचत गटांच्या विकास यांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. स्त्रीयांचे आणि मुलींचे साक्षरतेचे प्रमाण वाढताना स्त्रीविशयक धोरण आणि कायदे अधिक कडक करण्यात आले. ाासकीय, निमशासकीय यंत्रणामध्ये स्त्रियांना नोकरीत 30 टक्के आरक्षण मिळाले. स्थानिक स्वराज्य संस्थेत 50 टक्के आरक्षण मिळाले. महिला आर्थिक विकास महामंडळच्या माध्यमातुन, महाराश्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोन्नती अभियानाच्या माध्यमातुन स्त्रियांना व्यवसाय शिक्षण- प्रशिक्षणाच्या संधी

*उपलब्ध झाल्या. कायदेशीर मदतीसाठी राज्य महिला आयोग स्थापन झाला. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जिल्हा परिशद / पंचायत समित्या व ग्रामपंचायत) स्व उत्पन्नातील १० टक्के निधी स्त्री आणि बालकल्याणासाठी राखुन ठेवण्याची तरतूद करण्यात आली.*

*विविध पण एकाजिनशी लोकशाहीसाठी अनेक उपाययोजना केल्या जात असून त्यात पुरूशी वर्चस्वाची मानसिकता बदलली जात आहे. महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी देण्याचा प्रयत्न सुरू आहेत. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी नवीन राश्ट्रीय महीला धोरण तयार केले जात असून त्यात आरोग्य, शिक्षण, अर्थव्यवस्था, प्रशासन, निर्णय कायदे महिलासाठी अनुरूप केले जात असुन त्यात त्यांना न्याय दिला जात आहे.*

***स्त्रिया आणि अर्थविशयक नागरी हक्क :-***

*भारतात सज्ञान स्त्रियांची प्रमुख भुमिका गृहीणींचीच आहे. भरघोस उत्पन्न किंवा पगार मिळविणाऱ्या स्त्रियांची संख्या तुलनेने कमी आहे. उच्च आर्थिक वाढीच्या काळात तर ती अजुनही कमी झालेले दिसते. स्त्रियांनी करावयाची कामे वेगळी ठरविल्यामुळे किंवा ठराविक कामे स्त्रियांनीच करायची अशी भुमिका घेणे, स्त्रि आणि पुरूश यांना एकाच कामासाठी देण्यात येणाऱ्या मजुरीतील तफावत आणि उत्पादनक्षम स्त्रोतांची अनुपलब्धता या सगळया कारणांमुळे आर्थिक विशमता वाढीस लागते आणि स्त्रियांना अर्थविशयक संपूर्ण नागरी हक्क मिळवण्यात अडथळे येतात. मानवी क्षमता आणि बुध्दीमत्तेच्या अयोग्य वितरणाचा परिणाम स्थुल राश्ट्रीय उत्पादनावर होत असतो. रोजगार किंवा नोकऱ्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग १० टक्क्यांनी वाढला तरी २०२५ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ६०० अब्ज अमेरिकी डॉलर्सची भर पडेल. संपूर्ण कुटुंबाची काळजी घ्यायची जबाबदारी आणि घरातील कामासाठी घरचे पुरूश देत असलेला मर्यादित वेळ ही महिलांना नोकरी किंवा उद्योगात सहभागी होण्यापासुन रोखणारी प्रमुख कारणे आहेत.*

*स्त्रियांच्या अर्थविशयक नागरी हक्कांच्या सशक्तीकरणासाठी घराच्या उत्पन्नाला हातभार लावणारी आणि घराची काळजी घेणारी या भुमिकेसोबतच तिने स्वीकारलेल्या कामातुन तिच्या व्यक्तिगत आकांक्षा पूर्ण होणेदेखील महत्वाचे आहे. घराच्या आणि समाजाच्या वर्तुळात स्त्रियांवरची सामाजिक सांस्कृतिक बंधने शिथिल होण्यासोबतच त्यांना उत्तम सार्वजनिक सेवा-सुविधा पुरविण्यात राज्य सरकारने प्रशासकाची भुमिका निभावली तर स्त्रियांना स्वतःच्या सर्वसमावेशक विकासाचा पाठपुरवठा ाक्य आहे.*

***राश्ट्राच्या सक्षमीकरणात महिला नेतृत्वाचा विकास :-***

*भारताच्या लोकसंख्येत साधारणतः निम्मी संख्या महिलांची आहे. गेल्या काही वर्शापासुन सार्वजनिक जीवनात, कार्यालयात, आंतरराश्ट्रीय क्रियाक्षेत्रात सरकारी कार्यालयात, राजकारणात, आंतरराश्ट्रीय संस्थान आणि अशा अनेक ठिकाणी महिलांचा वापर वाढला आहे. हा बदल सकारात्मक असुन आधीपेक्षा हा बदल आता झपाट्याने वाढत आहे. ाालेय शिक्षणात मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न ठेवता त्यात समानता न ठेवता त्यात समानता आणण्यात भारताला यश मिळाले आहे. विधी माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन यासारख्या तंत्र शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणातही महिला प्रतिनिधीत्वात बरिच वाढझालेली आहे. महिला साक्षरतेतही बरिच वाढझालेली आहे. महिलांच्या*

विकासासाठी सुरक्षित आणि प्रोत्साहनदायी वातावरणाबरोबरच त्यांना समान संधी मिळावी यासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. शिक्षण आणि कामाच्या ठिकाणी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे ारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी, सार्वजनिक आणि राजकीय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना कुटुंबात आणि इतरत्र समान वागणूक मिळावी यासाठी अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**उज्वला योजना :-**

घरातील महिला घरी खुप काम करतात आणि हे काम बिना मोबदला तर असतेच त्याचबरोबर त्याची दखलही अनेकदा घेतली जात नाही. महिला सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी उज्वला योजना आणण्यात आली असून या योजनेव्दारे दारिद्रय रेशेखालील कुटुंबांच्या स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरची मोफत जोडणी पुरविण्यात येते. जास्तीत जास्त गॅस जोडण्या मंजुर करण्यात आल्या आहेत. यामुळे या महिलांना लाकडावरच्या स्वयंपाकाच्या किचकट आणि आरोग्याला हाणीकारक ठरणाऱ्या कामापासुन मुक्ती मिळत असुन गॅस सिलेंडरच्या स्वयंपाकामुळे वाचलेल्या वेळेचा इतर भरीव कामासाठी त्याचा उपयोग करू ाकतात.

**समर्थ समाजाकरिता सक्षम महिलांची आवश्यकता :-**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाराश्ट्र ाासनामार्फत अनेक योजना राबविण्यात येत आहे. यात विशेश करून महिला आणि बालविकास विभाग तसेच ग्रामविकास विभागाने विशेश पुढाकार घेतला आहे. ाासनाच्या या योजनांचा लाभ थेट महिलांपर्यंत पोहचत असून त्यांचे ौक्षणिक, सामाजिक, आर्थिक उन्नतीकरण होत आहे. देशाच्या विकासात महिलांचा सहभाग लाभल्यास देश प्रगती पथावर अधिक गतीने वाटचाल करू ाकतात हे लक्षात घेवून महिला सक्षमीकरणावर अधिक भर देण्यात येत आहे.

**माझी कन्या भाग्यश्री :-**

मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींचे शिक्षण, आरोग्य यामध्ये सुधारणा करणे, त्यांच्या उज्वल भविश्याकरिता आर्थिक तरतुद करणे, बालीका भ्रुणहत्या रोखणे, मुलींच्या जन्माबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार आणणे, बालविवाह रोखणे याकरिता महिला आणि बालविकास विभागामार्फत 'माझी कन्या भाग्यश्री योजना' सुरू करण्यात आली आहे. एका मुलीवर कुटूंब नियोजन ास्त्रक्रिया केल्यास या योजनेतुन मुलींच्या नावे ५० हजार रूपये फिक्स डिपॉझीटद्वारे बँकेत गुंतविले जातात. मुलींच्या वयाच्या सहाव्या व बाराव्या वर्शी तिचे शिक्षण आणि पोशणासाठी व्याजाची रक्कम काढूण घेण्यास व अठराव्या वर्शी मुलींच्या उच्च शिक्षणासाठी व्याजाची रक्कम मुळ गुंतवणूक रक्कमेसह काढून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. दोन मुलींच्या जन्मानंतर कुटूंब नियोजन ास्त्रक्रिया केल्यास प्रत्येकी २५ हजार रूपये इतकी रक्कम मुलींच्या नावे बँकेत गुंतवणूक केली जाते. मुलींना या योजनेचा लाभ बऱ्याच प्रमाणात झाला आहे.

**बचत गटांना ुन्य टक्के व्याजदराने कर्ज :-**

महिला आर्थिक विकास महामंडळ आणि उमेद अभियान यांच्या अंतर्गत महिला सक्षमिकरणाचे काम सुरू आहे. बचत गटांना विविध उद्योग व्यवसायासाठी बँकेमार्फत पतपुरवठा केला जातो. महाराश्ट्र ाासनाने बचत गटांना बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करून देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. याकरिता सुमतीबाई सुकळीवर

उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना महाराष्ट्र शासनाने सुरु केली आहे. राज्यातील अडीच लाख बचत गट या योजनेचे लाभार्थी असुन एकूण २५ लाख कुटुंबे या योजनेचा लाभ घेत आहेत. सन २०१६-१७ साठी राज्य शासनाने व्याज अनुदानासाठी १० कोटी रूपये तरतुद उपलब्ध करून दिली होती. राज्यात सन २०१९ पर्यंत ५ लाख बचत गटांना म्हणजेच साधारण ५० लाख कुटुंबांना यो योजनेचा लाभ देण्यात आला.

**अस्मिता योजना :-**

किशोरवयीत मुलींना फक्त ५ रूपयात व अन्य महिलांना स्वस्त दरात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देणे तसेच त्याच्या विक्री व्यवसायातुन बचत गटांच्या महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ०८ मार्च रोजी जागतिक महिला दिनी अस्मिता योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. महिलांमध्ये मासिक पाळीच्या काळात सॅनिटरी नॅपकीन वापरायचे प्रमाण सध्या फक्त १७ टक्के इतके आहे. अस्मिता योजनेच्या माध्यमातुन पहिल्या वर्षात ग्रामीण भागात हे प्रमाण ६० टक्के इतके करण्याचे उद्दिष्टे आहे. तसेच दुसऱ्या वर्षी ग्रामीण भागातील १०० टक्के किशोरवयीन मुली आणि महिलांपर्यंत सॅनिटरी नॅपकीन स्वस्त दरात पोहचविण्याचे उद्दिष्ट आहे.

**मुलींना फक्त ५ रूपयात ८ सॅनिटरी नॅपकीन :-**

अस्मिता योजनेतुन जिल्हा परिशद शाळांमधील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींना २४० मीमीच्या ८ पॅडचे एक पाकीट ५ रूपयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. अस्मिता कार्ड हे पहिल्या टप्प्यात राज्यातील साधारण ६ लाख मुलींना देण्यात येत आहे. अस्मिता कार्डधारक किशोरवयीन मुलींना ५ रूपयाप्रमाणे विक्री केलेल्या पॅकेटच्या संख्येच्या प्रमाणात प्रती पॅकेट १५ व २० रूपये इतके अनुदान शासन बचत गटांना देणार आहे. किशोरवयीन मुलींना वर्शभरात १३ पाकीटे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या योजनेतुन ग्रामीण भागातील महिलांनाही माफक दरात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्यात येत आहेत. बचत गट हे वितरकांकडुन सॅनिटरी नॅपकीनचे पाकीट खरेदी करून परस्पर विक्री करीत आहेत.

विकास साध्य करण्यासाठी महिलांचा सबलीकरणाइतके दुसरे प्रभावी साधन नाही आज अशी परिस्थिती आहे की, पारंपारिक भुमिका असो की आधुनिक महिलांसाठी कोणतीही गोश्ट आता असाध्य राहिलेली नाही. माता, भगिनी आणि सहचारीनी अशा वेगवेगळ्या भुमिका निभावत असतांना महिला नेहमीच पुरूशांना भक्कम साथ देत असतात. आज आधुनिक जगात तर महिला शिक्षीका आहेत, व्यवस्थापक आहेत आणि राजकारणातही आहेत. त्याचप्रमाणे फक्त पुरूशांचीच मक्तेदारी असलेल्या गिर्यारोहण, वैमानिक आणि लश्कर अशा क्षेत्रातही महिला आता कर्तृत्व गाजवू लागल्या आहेत. महिला आर्थिक, सामाजिक व राजकीय सबल झाल्याशिवाय त्यांचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. म्हणून महिला सबलीकरणावर शासन व समाजाने अधिक भर देणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

महिला सबलीकरण समस्या व उपाय - प्रा.डॉ. सौ. रेखा हिंगोले इशा प्रकाशन, शिवाजी चौक, लातुर माने प्रथम आवृत्ती २००६.

स्त्री - पर्व - मंगला सामंत, नेटवर्क प्रकाशन 'लालित्य; ५०४ महात्मा सोसायटी गांधीभवन, कोथरूड, पुणे ३८ आवृत्ती दुसरी १६ सप्टेंबर २००८.

स्त्री विचारधन - प्रा. माधवी कवि, उन्मेय प्रकाशन, पुणे.

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

*योजना (मासिक), सप्टेंबर - २०१६.*
*योजना (मासिक), आक्टोंबर - २०१८.*
*स्त्री (मासिक), जुलै २००८.*
*लोकसत्ता- एप्रिल २०१७.*